सीएनएफ २०६०८२०१०
आरइीआय/२०१०-११/१८२
आरपीसीडी. सीओ. एफआयडी. बीसी. क्र. २४३३/१२.०१.०१२/२०१०-११ ऑगस्ट २६,२०१०

**अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक/मुख्य कार्यकारी अधिकारी सर्व अधिसूचित वाणिज्य बँका**

महोदय,

**निरनिराळया सरकारी शिष्यवृत्ती मिळविण्यासाठी विद्यार्थ्यांनी नो-फ्रिल्स खाती उघडणे**

सचिव, भारत सरकार, अल्पसंख्या घटना मंत्रालय ह्यांच्या कडून आमच्या नजरेस आणण्यात आले आहे की, राज्य/युती सरकारमार्फत ह्या मंत्राव्दारे अल्पसंख्याक जमातींच्या इच्छुक विद्यार्थ्यांना दिल्या जाणाऱ्या शिष्यवृत्तीसाठी, बँका "नो फ्रिल्स" खाती उघडण्यास तयार नाहीत. सरकारच्या शिष्यवृत्ती योजनांसाठी अर्ज करणाऱ्याना ह्यामुळे त्रास होत आहे व टीकाही होत आहे.

२) ह्या संबधाने, आम्ही आपले लक्ष, आमचे परिपत्रक डीबीओडी. एलईजी. बीसी. ४४/०९.०७.००५/२००५-०६ दि. नोव्हेंबर ११, २००५ ह्यामधील, अनुसूचित वाणिज्य बँकांव्दारे नो फ्रिल्स खाती उघडण्याबाबतच्या विषयाकडे वेधत आहोत त्याच प्रमाणे, आमचे महापरिपत्रक आरपीसीडी. एसपी. बीसी. क्र. ४/०९.१०.०१/२०१०-११ दि.जुलै१,२०१० ह्याचाही संदर्भ देत आहोत अल्पसंख्याक जमातींना प्राधान्य क्षेत्रातील कर्ज सुविधा देण्याबाबतच्या ह्या महापरिपत्रकात सांगण्यात आले आहे की, निरनिराळ्या सरकार प्रायोजित खास कार्यक्रमांव्दारे मिळणाऱ्या लाभांचा रास्त व पुरेसा भाग अल्पसंख्याक जमातींना मिळेल ह्याबाबत काळजी घेतली जावी.

३) सरकारकडून दिले जाणारे इतर लाभ व निरनिराळ्या शिष्यवृत्ती मिळविण्यासाठी अल्पसंख्याक जमातीमधील किंवा अन्य लाभहीन गटांमधील विद्यार्थ्यांसाठी नो फ्रिल्स खाती उघडली जात आहेत ह्याची खात्री करून घेण्यासाठी आपणास सांगण्यात येत आहे. तथापि अशी खाती उघडताना त्यासाठी योग्य ते केवायसी निकषांचे पालन केले जावे.

आपली,
(सुषमा विज)
उप महाव्यवथापक